**इतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ८४/२०२४**
**<u>मधील निशाणी १ वरील आदेश</u>**
<u>(CNR No.MHWS04000672-2024)</u>

अर्जदार भुषण अजाबराव राउत यांनी मंगरुळपीर पोलीस ठाणे, गुन्हा नों. क्र. ३६९/२०२४ मधील जप्त मुद्देमाल एक बजाज कंपनीची मोटारसायकल क्र. एम.एच.३७/ए.सी./६१२०, चेचीस क्र. MD2B64BX8NWL08380, इंजीन क्र. DHXWNL22525 बंधपत्रावर परत मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. तपासीक अंमलदार यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर करून अर्जास जोरदार हरकत घेतली. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे सादर करून सदर अर्ज नामंजूर करण्यास विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरण हे ई-फाईलिंगव्दारे दाखल करण्यात आलेले आहे. प्रस्तुत अर्जावर ई-फायलिंगव्दारे त्यांचे म्हणणे सादर करण्यास सहा. सरकारी वकील व पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे मंगरुळपीर यांनी तांत्रिक कारणामुळे असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे त्यांनी दाखल केलेले म्हणणे कागदपत्रांव्दारे दाखल केलेले आहे.

४. प्रस्तूत अर्जाच्या पुष्टयर्थ अर्जदाराने गुन्हा नोंद क्र. ३६९/२०२४ यातील फिर्याद, आर. सी. बुक, इंन्सुरन्स इत्यादी कागदपत्रांच्या सत्य प्रती सादर केल्या आहेत.

५. अर्जातील कथन, प्रतिज्ञापत्र व तपासीक अंमलदार यांचे म्हणणे पाहिले. अर्जदाराचे विद्वान वकील व सहा. सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच वरील कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता जप्त मुद्देमाल एक बजाज कंपनीची मोटारसायकल क्र. एम.एच.३७/ए.सी./६१२० हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे दिसून येते. सदर वाहन पोलीस ठाण्यामध्ये पडून राहिल्यास ते खराब होऊ शकते. त्याचे नुकसान होऊन मुल्य कमी होऊ शकते. तरी काही अटींवर सदर वाहन अर्जदारास परत केल्यास अभियोग पक्षास बाधा येणार नाही. म्हणून

मी पुढील आदेश करीत आहे.

**आदेश**

(१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

(२) मंगरुळपीर पोलीस ठाणे, गुन्हा नों. क्र. ३६९/२०२४ मधील जप्त एक बजाज कंपनीची मोटारसायकल क्र. एम.एच.३७/ए.सी. /६१२०, चेचीस क्र. MD2B64BX8NWL08380, इंजीन क्र. DHXWNL22525 याचा अंतरीम ताबा अर्जदार यास खटल्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत रु.१,२५,०००/- (एक लाख पंचवीस हजार रुपये मात्र) च्या बंधपत्रावर देण्यात यावा.

(३) अर्जदार यांनी जप्त मुद्देमाल वाहन न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणासही विकू नये किंवा हस्तांतरीत करु नये अथवा मुद्देमालाच्या स्वरूपामध्ये जसे रंग वैगेरे बदल करू नये.

(४) संबंधीत ठाणे अंमलदाराने सदर मुद्देमालाचे सर्व बाजूने छायाचित्र घेऊन तसा पंचनामा करुन न्यायालयात दोषारोपपत्रासोबत दाखल करावे.

(५) अर्जदाराने सदर मुद्देमाल न्यायालयात आवश्यक असल्यास सुनावणीवेळी न्यायालयाच्या आदेशानुसार न्यायालयात हजर करावा.

(६) अर्जदाराने सदरचे वाहन अशा प्रकारच्या गुन्हयामध्ये वापरु नये अथवा वापरण्यास देऊ नये.

(७) आदेशाची प्रत गुन्हा नोंदणी क्र. ३६९/२०२४ मंगरुळपीर पोलीस स्टेशनच्या रिमांड पेपर्स सोबत जोडावी.

**स्वा/—**
(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
मंगरुळपीर.

दि. ०४/०७/२०२४

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | A. B. Padole (Stenographer L.G) |
| Date of Judgment | :- | 04.06.2024 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 04.06.2024 |
| Judgment/Order uploaded on | :- | 05.06.2024 |